(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIII / Issue – IV ISSN 2277-8063

# 'काळ'कर्ते शिवराम महादेव परांजपे – जहाल राष्ट्रवादी विचार

**प्रा. विनायकराव गोरखनाथ जाधव** शिक्षण महर्षी डॉ. बापुजी साळुंखे महाविद्यालय, कराड जि. सातारा

९८८१४४०१११

---

**प्रस्तावना –**

'काळ' कर्ते शिवराम महादेव परांजपे हे महाराष्ट्रात जहाल देशभक्त व वैशिष्ट्यपूर्ण निबंधकार म्हणून सुप्रसिद्ध आहेत. शिवरामपंत परांजपे यांचा जन्म दि. २७ जून, १८६४ रोजी महाड येथे झाला. त्यांचे बालपण व विद्यार्थीदशा खूप मजेत गेली. त्यांचे वडील महाड मधील एक नामांकित वकील होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण महाड येथे, माध्यमिक शिक्षण रत्नागिरी येथे व उच्च शिक्षण पुणे येथे झाले. १८९६ व १८९७ ही दोन वर्षे शिवरामपंतांनी पुणे येथील महाराष्ट्र कॉलेजमध्ये संस्कृतचे प्राध्यापक म्हणून काम पाहिले. नेमके याच सुमारास महाराष्ट्रात उद्भवलेल्या दुष्काळ व प्लेग सारख्या भयंकर परिस्थितीत टिळकांनी सरकारविरुद्ध हाती घेतलेल्या दुष्काळी चळवळीच्या मोहिमेत शिवरामपंतांनी पुढाकार घेतल्याने, महाराष्ट्र कॉलेजचे संस्थापक व सह-अध्यापक यांच्याशी त्यांचे खटले उडू लागले. त्यामुळे १८९७ मध्ये त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला व एक प्रकारे टिळकांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सरकारशी दोन हात करण्यास पंत तयार झाले.

महाराष्ट्रातील तत्कालीन परिस्थितीची लोकांना जाणीव होण्याच्या उद्देशाने २५ मार्च, १८९८ मध्ये त्यांनी 'काळ' हे वृत्तपत्र सुरू केले. 'काळ' पत्रातील त्यांच्या तेजस्वी व स्फोटक विचारामुळे ब्रिटिश सरकारने त्यांना देशद्रोही घोषित करून १९०८ मध्ये त्यांना १९ महिन्याची तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. पुढे १९१० मध्ये त्यांची सुटका झाल्यानंतरही त्यांनी 'काळ' पत्र जोमाने सुरूच ठेवले. तथापि, नंतर ते प्रेस कायद्याचे बळी ठरले. १२ ऑगस्ट, १९२० मध्ये त्यांनी 'स्वराज्य' हे दुसरे वृत्तपत्र सुरू केले. या पत्रातून त्यांनी महात्मा गांधीजींचे तत्त्वज्ञान मांडले. गांधीजींच्या असहकारितेच्या तत्त्वाचे समर्थन करून त्यांनी सुरू केलेल्या असहकारितेच्या चळवळीत ते सहभागी झाले व त्यांचे अनुयायी बनले. त्याकाळात जेव्हा 'वंदे मातरम' हे केवळ उच्चारणेही दंडणीय होते, तेव्हा त्यांनी उघडपणे 'पूर्ण स्वातंत्र्या'चा पुरस्कार केला. शिवरामपंत परांजप्यांनी आपल्या वाङ्मय साहित्यातून व तेजस्वी वाणीतून जनतेला राष्ट्रधर्माची व उत्कट स्वातंत्र्यप्रेमाची शिकवण दिली. त्यांच्या एकूणच योगदानाची दखल घेऊन १९२९ मध्ये बेळगाव येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली.

**शिवराम महादेव परांजपे यांचे जहाल राष्ट्रवादी विचार :**

शिवरामपंत परांजपे यांच्या जहाल राजकीय विचार जागृतीचा गाभा म्हणजे त्यांचे ‘काळ’ हे वृत्तपत्र होय. त्यातील विचारांच्या आधारे त्यांचे जहाल राष्ट्रवादी विचार आपणास अभ्यासता येतील, ते पुढील प्रमाणे आहेत.

**१) स्वातंत्र्य हेच अंतिम ध्येय :**

शि. म. परांजपे यांनी स्वातंत्र्य हेच आपले अंतिम ध्येय मानले. उत्कट स्वातंत्र्यप्रेमापोटीच चालून आलेली उच्च दर्जाची सरकारी नोकरी त्यांनी झिडकारली व 'राजद्रोही' टिळकांच्या पक्षात दाखल होऊन त्यांनी आपले लोकजागृतीचे कार्य चालू ठेवले. स्वातंत्र्य ही केवळ एक कल्पना नसून ते एक आदर्श मूल्य आहे, असे त्यांचे मत होते. राजकीय क्षेत्रात पदार्पण केल्यापासून ते आयुष्याच्या अखेरपर्यंत परांजपे हे केवळ स्वातंत्र्याच्याच ध्येयाने प्रेरित झालेले होते. स्वातंत्र्य प्रेम ही भावना अखिल मानवव्यापी असल्यामुळे हिंदुस्थानचे स्वातंत्र्य आळविताना परांजप्यांनी जगभरातील स्वातंत्र्य भक्तांचे कौतुक केले आहे. सुरुवातीस टिळकांच्या नेतृत्वाखाली व नंतर गांधींच्या नेतृत्वाखाली परांजप्यांनी काम केले. दोहोंच्याही नेतृत्वाखाली काम करत असताना स्वातंत्र्याच्या ध्येयावरून त्यांचे लक्ष कधीही विचलित झाले नाही. परांजप्यांच्या दोन्ही काळच्या भूमिकेचे स्वातंत्र्याचा ध्यास हेच एकमेव समान अधिष्ठान होते. परांजपे आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत स्वातंत्र्याच्या ध्येयापासून तसूभरही विचलित झाले नाहीत. सुरुवातीपासून परांजपे ज्याकरिता लढत राहिले, त्या स्वातंत्र्याच्या ध्येयाचा त्यांनी दूरदृष्टीने विचार केला होता. अखेरीस त्यांचे स्वातंत्र्याचे ध्येय १९२९ च्या लाहोर येथील काँग्रेसच्या अधिवेशनात स्वीकारले गेले. लोकमान्य टिळकदेखील सर्वसंग्राहकतेमुळे असो किंवा व्यवहारीपणामुळे असो परंतु साम्राज्यांतर्गत स्वराज्याची मागणी करत होते. परंतु शि. म. परांजपे यांनी मात्र पहिल्यांदा उघडपणे निर्भेळ स्वातंत्र्याचा उद्घोष केला.

**२) सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार :**

शिवरामपंत परांजपे हे टिळकांचे कट्टर अनुयायी व सहकारी होते. परंतु परांजपे हे टिळकांच्या पेक्षाही अधिक जहाल होते. टिळकांनी सुरू केलेल्या चळवळीला प्रोत्साहन देऊन त्यांची गती वाढवणे, ही परांजप्यांची सार्वजनिक भूमिका होती. दोघेही एकाच पक्षाचे, दोहोंचीही मते परस्परपूरक व दोहोंचेही स्वातंत्र्यप्राप्ती हेच समान ध्येय होते. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीच्या उपाययोजनेबाबत मात्र दोहोंत वैचारीक मतभेद होते. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सनदशीर चळवळींच्या मार्गांचा वापर करावा की गुप्त संस्थांची मदत घेऊन, सशस्त्रता व दहशतवादाचा अवलंब करावा? याबाबत दोहोत कमालीचे अंतर होते. असे असले तरी दोहोंचेही अंतिम ध्येय 'स्वातंत्र्यप्राप्ती' हेच असल्याने, परांजप्यांनी आपल्या विचारांचा फारसा आग्रह धरला नाही. उलट, टिळकांच्या कर्तृत्वावर त्यांचा पूर्ण विश्वास असल्याने ते आखतील त्याच धोरणाला पाठिंबा देऊन त्यांनी ठरवलेल्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे, हेच परांजप्यांचे धोरण होते. परांजप्यांचा सनदशीर चळवळीवर मनापासून विश्वास नव्हता. देशाचे स्वातंत्र्य मिळवावयाचे असल्यास गुप्त संस्थांचे जाळे विणून दहशतवादाच्या मार्गाचा अवलंब केला पाहिजे, असे त्यांचे रोखठोक मत होते. परांजप्यांचे राजकारण हे लोकाभिमुख व त्यांच्या मूळ स्वभावास अनुसरून असेच होते. लोकांमध्ये ताठरपणा व निर्भयता येऊन त्यांच्या अंगी स्वावलंबीवृत्ती जोपासली जावी हाच त्यांच्या प्रयत्नांचा पाया होता. टिळकांच्या निधनानंतर पुढील धोरण निश्चित करण्यासाठी टिळक अनुयायांच्या मुंबई येथील बैठकीत ज्याने '

'रेव्होल्युशन' जवळ येईल ती बाब प्रथम हाती घ्यावी, असे स्पष्ट व परखड मत परांजपे यांनी मांडले होते.

**३) पारतंत्र्याविषयी चीड व स्वातंत्र्याचा आग्रह :**

शिवरामपंत परांजपे हे स्वातंत्र्याचे कट्टर अभिमानी व पुरस्कर्ते होते. त्यांना पारतंत्र्याविषयी कमालीची चीड होती. 'स्वातंत्र्य' हाच एकमेव विचार लोकांच्या गळी उतरवणे, हेच त्यांच्या डोळयासमोरील मुख्य उद्दिष्ट होते. हिंदुस्थानातील लोकांच्या मनात स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा याविषयी प्रीति उत्पन्न करून त्यांना स्वातंत्र्योत्सुक बनविणे या हेतूने त्यांनी आपले लिखाण केले आहे. त्यांच्या सर्व लेखांच्या मुळाशी प्रखर देशाभिमान व स्वसंस्कृतीविषयी वाटणारा आदर आहे. आपल्या एकूणच साहित्य संपदेचा उपयोग त्यांनी पारतंत्र्याविषयी चीड, स्वातंत्र्याविषयी तळमळ व भविष्यकालीन असा वाद निर्माण करण्यात केला आहे. परांजप्यांनी धर्माचा, समाजाचा, इतिहासाचा, इतकेच नव्हे, तर वाङ्मयाचाही विचार संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य या एका दृष्टीने केला आहे. १७८९, १८३० व १८४८ अशा तीनही वर्षी फ्रेंचमध्ये झालेल्या राज्यक्रांतीने संपूर्ण युरोप खंडात वैचारिक जागृती झाली. त्याचा परिणाम म्हणून अनेक राष्ट्रांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रयत्न केले. ऑस्ट्रिया साम्राज्यातील इटली, जर्मनी, हंगेरी यासारख्या राष्ट्रांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी व प्रजासत्ताक राज्यपद्धती अस्तित्वात आणण्यासाठी केलेले प्रयत्न व त्यांचे यशापयश यांचा इतिहास सांगून आपणही त्यांच्यापासून बोध घ्यावा असे परांजप्यांना वाटत होते.

परांजप्यांनी फ्रेंच राज्यक्रांतीच्या परिणामांचे सिंहावलोकन केले होते. राज्यक्रांती घडवून आणण्याच्या दृष्टीने शिक्षण व शस्त्रे या दोन्ही गोष्टी परांजप्यांना महत्त्वाच्या वाटत होत्या. शिक्षणामुळे लोकांच्या मनात स्वातंत्र्याविषयी आवड निर्माण होते आणि शस्त्रांची मदत इतरांकडून झाली तरी त्याचा वापर कसा करावयाचा याचे ज्ञान माहीत असणे अतिशय आवश्यक असते. त्यादृष्टीने देशातील प्रत्येक तरुण सशक्त व्यक्तीला थोडेतरी लष्करी शिक्षण मिळाले पाहिजे असे त्यांना वाटत होते.

**४) काँग्रेसच्या मवाळ धोरणास विरोध :**

शिवरामपंतांनी काँग्रेसच्या मवाळ धोरणास प्रखर विरोध केला आहे. तो करताना काँग्रेस व नेमस्त पुढाऱ्यांचे दोषही त्यांनी वेळोवेळी दाखवून दिले आहेत व त्यावर कडक शब्दांत टीका केली आहे. परांजप्यांच्या काँग्रेस प्रवेशावेळी काँग्रेसची सूत्रे फिरोजशहा मेथांसारख्या नेमस्त प्रभृतींच्या हाती होती. त्यावेळी सरकारकडे केवळ अर्ज विनंत्या करणे व ठराव पास करून घेणे एवढेच मर्यादित काम काँग्रेसमध्ये चालत असे. शिवाय या नेमस्त मंडळीची राजकीय हक्क-अधिकारांपेक्षा सामाजिक व धार्मिक सुधारणांविषयी आग्रही मागणी होती. त्यामुळे काँग्रेस जोपर्यंत मवाळ लोकांच्या हातात आहे, तोपर्यंत तिच्या हातून कोणतेही धडाडीचे व प्रगतीचे कार्य होणार नाही, असे परांजप्यांना वाटत होते. परांजप्यांना काँग्रेस प्रवेशावेळेपासूनच काँग्रेसचे कार्य समाधानकारक वाटत नव्हते. मुळातच काँग्रेस ही संस्था युरोपियनांनी काढून दिलेली असल्यामुळे ती आपल्या दृष्टीने खऱ्या फायद्याची आहे की नाही? याबाबत त्यांना शंका वाटत होती. परांजप्यांनी आपल्या 'काळ' वर्तमानपत्रातील 'काँग्रेस व तिचे पुढारी' या लेखात काँग्रेसचा

निरुपयोगीपणा, पक्षांतर्गत कलह, पक्षभेद व मतभेद, अकार्यक्षम पुढारी व मवाळ/नेमस्त पुढाऱ्यांची धनलोलुपता यासारख्या दोषांची हजेरी घेऊन त्यावर कडक शब्दांत टीका केली आहे.

परांजपेंच्या मते, काँग्रेस पक्षांतर्गत कलहामुळे पूर्णत: पोखरली गेली आहे. त्यामुळे काँग्रेस आपल्या मुख्य कार्यापासून दूर होत चालली आहे. सभेची पूर्वतयारी करणे, सभेतील भाषणे व सभेचा रिपोर्ट तयार करणे यासारखी ठराविक कामे करताना देखील काँग्रेसच्या कार्यावर मर्यादा पडू लागल्या आहेत. त्यामुळे काँग्रेसचे स्वराज्यप्राप्तीचे मुख्य ध्येय साध्य होणे अत्यंत अवघड होऊन बसले आहे असे त्यांना वाटत होते. त्यांच्यामते, काँग्रेसला योग्य वळण लावेल असा एकही सक्षम पुढारी त्यांच्याकडे नाही. एवढेच नव्हे, तर कुवत असूनही सरकारी नोकरीच्या मोहपाशात अडकलेल्या न्यायमूर्ती रानडे यांच्यावरही परांजपे यांनी अत्यंत कडक शब्दात टीका केली आहे.

**५) इंग्रज सरकारच्या विरोधात परखड मत:**

इंग्रज राज्यकर्त्यांबद्दल हिंदुस्थानातील जनतेत येनकेन प्रकारे प्रतिकूल मत तयार करणे, हे त्यांचे उद्दीष्ट होते. त्यास अनुसरूनच इंग्रज राज्यकर्त्यांचे दडपशाही व साम्राज्यवाढीचे धोरण, 'फोडा व झोडा' नीती, मानभावीपणा, संशयीवृत्ती यासारख्या अनेक बाबींवर परांजपे यांनी प्रकाश टाकला आहे.

परांजप्यांनी इंग्रजांच्या कपटनीतीवर व फसवेगिरीवर परखड शब्दात घणाघात केला आहे. आपल्या ‘काळ’ पत्रातील ‘उडदाच्या राशीत आणखी एक उडीद स्वतंत्र’ या लेखात त्यांनी इंग्रज राज्यकर्त्यांविरुद्ध उपरोधाने न लिहिता उघड-उघड प्रतिपादन केले आहे. त्यांच्या मते, इंग्रजांनी हिंदुस्तानात प्रवेश करण्यासाठी कपटनितीचा वापर केला व तो जिंकून घेतला. त्यासाठी इंग्रज राज्यकर्त्यांनी वेळोवेळी अनेक युक्त्या व लुच्चेगिरीचा वापर केला. परांजप्यांनी इंग्रजांचे दुटप्पी व स्वार्थी धोरण स्पष्ट करत असतानाच त्यांची मानभावी वृत्तीही दाखवून दिली आहे. त्यांनी ‘इंग्लिशांची परोपकार बुद्धी’ या आपल्या लेखात वरवर पाहता इंग्रजांची स्तुती केली आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र आतून तीव्र निंदा केली आहे.

शि. म. परांजपे यांनी इंग्रजांच्या साम्राज्यवाढीच्या धोरणास प्रखर विरोध केला आहे. त्यांच्यामते, इंग्रजांनी हिंदुस्थानात सुरू केलेल्या आगगाड्या या इंग्रजांच्या फायद्यासाठी आहेत. त्या आगगाड्यांच्या माध्यमातून कमी वेळेत जास्तीत जास्त सैन्य हवे त्या ठिकाणी नेता येईल व व्यापाराच्या आणि प्रवाशांच्या माध्यमातून हिंदुस्थानातील पैसा सहज रीतीने काढून इंग्लंडमध्ये नेता येईल, हा त्यामागील इंग्रजांचा मूळ हेतू आहे, असे परांजप्यांचे स्पष्ट मत होते.

हिंदुस्थानच्या प्रचंड आर्थिक दुर्दशेला केवळ ब्रिटिश राज्यकर्तेच जबाबदार आहेत असे त्यांचे स्पष्ट मत होते. हे कटू सत्य त्यांनी आपल्या 'काळ' पत्रातील विविध लेखांमधून उपरोधिकपणे व्यक्त करून इंग्रजांवर निशाणा साधला आहे. त्यांच्यामते, हिंदुस्थानातून दरवर्षी शंभर कोटी उत्पन्नातील कमीत कमी वीस कोटी रुपये इंग्लंडला जातात. याशिवाय इंग्लंडचे लोक येथे येऊन नेटिवांच्या तोंडचा घास काढून त्यावर मौजमस्ती करतात. त्यामुळे हिंदुस्तान देश दिवसेंदिवस भिकारी होत चालला आहे. परकीय राज्यकर्त्यांची अतोनात खर्चाची राज्यपद्धती हेच दुष्काळाचे मुख्य कारण आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते.

लॉर्ड कर्झनने १९०५ साली बंगालची फाळणी केली. बंगाली जनतेने या फाळणीला तीव्र विरोध केला. तरीही १६ ऑक्टोबर, १९०५ रोजी बंगालमध्ये दुहेरी राज्यव्यवस्था अस्तित्वात आली. बंगालमध्ये हा दिवस ‘सुतकी दिवस’ म्हणून पाळला गेला. संपूर्ण बंगाल प्रांतात याच दिवशी राष्ट्रीय बहिष्काराची शपथ घेतली गेली. वेगवेगळ्या जाहीर सभांमधून हा नारा दिला गेला व राष्ट्रीय लढ्याचे रणशिंग फुंकले गेले. हळूहळू हे राष्ट्रीय लढ्याचे हे लोण संपूर्ण देशभर पसरले. हा कालखंड दडपशाहीचा असल्याने ब्रिटिश राज्यकर्त्यांचे एक वेगळे आक्रमक दर्शन परांजपे यांनी घडवले.

**६) संस्थानिकांना प्रखर विरोध :**

परांजपे हे स्वातंत्र्याचे कट्टर पुरस्कर्ते होते. हिंदुस्थानचे स्वातंत्र्य हेच त्यांचे अंतिम ध्येय होते. त्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीसाठी धडपडणाऱ्या प्रत्येकाविषयी त्यांच्या मनात आस्था होती. त्यामुळेच त्यांनी वेळोवेळी स्वातंत्र्यभक्तांचे गुणगान/कौतुक केले आहे. परंतु अशा स्वातंत्र्य भक्तांचे गुणगान करतानाच स्वातंत्र्याला विरोध करणाऱ्या व स्वातंत्र्याआड येणाऱ्या स्वकियांविषयी त्यांनी तीव्र शब्दात आपला रोष प्रकट केला आहे. सरकारी मोहपाशात अडकलेले नेमस्त राजकारणी, इंग्रजांचे लांगून चालन करणारे संस्थानिक, हिंदूंना बाटवणारे ख्रिस्ती धर्मोपदेशक, समाजसुधारक, एवढेच नव्हे, तर पाश्चात्य संस्कृतीच्या झगमगाटास भुललेल्या सर्वसामान्य लोकांवरही त्यांनी कडक शब्दात टीका केली आहे. परांजपेंच्या मते, हिंदुस्थानच्या दुर्दशेला केवळ इंग्रजच जबाबदार आहेत असे नसून आपणही

तितकेच जबाबदार आहोत. त्यामुळेच त्यांनी वेळोवेळी हिंदुस्थानातील संस्थानिक, राजे, महाराजे यांना आपल्या टीकेचे लक्ष्य बनवले आहे. परंतु हे करण्याअगोदर त्यांनी आपल्या देशातील लोकांचे अल्पसंतुष्ट वृत्ती, स्वार्थीपणा, लाचारी व फंदफितुरी यासारख्या दोषांवर उघडउघड व कडक शब्दात टीका केली आहे.

परांजप्यांनी इंग्रज राज्यकर्ते व येथील राजे-महाराजे व संस्थानिक यांच्यात अप्रत्यक्षपणे ठरलेल्या देवाणघेवाणीच्या व्यवहारावर स्पष्ट व परखडपणे टीका केली आहे. त्यांच्यामते, हिंदुस्तानातील संस्थानिकांनी इंग्रज राज्यकर्त्यांना सहकार्य करायचे आणि त्या बदल्यात राज्यकर्त्यांनी अशा संस्थानिकांना मानाच्या पदव्या देऊन सन्मानित करायचे असाच व्यवहार उभयतांमध्ये ठरल्याचे त्यांना वाटत होते. परांजप्यांना असे वाटत होते की, इंग्रज राज्यकर्ते हे हिंदुस्थानातील संस्थानिकांवर दडपण आणत आहेत. परंतु असे असले तरी येथील संस्थानिकांच्या मनात स्वदेशाबद्दल अप्रीती निर्माण होऊन, इंग्लिश लोकांबद्दल कमालीची आस्था व प्रेम निर्माण होते. याचेच परांजप्यांना अधिक आश्चर्य वाटून, याविषयी त्यांनी प्रचंड चीड व्यक्त केली आहे.

**७) १९२० नंतरचा वैचारिक बदल :**

१९२० नंतर परांजपे यांच्यात झालेले काही वैचारिक बदल पुढील प्रमाणे:

१) परांजपे हे टिळकांचे कट्टर अनुयायी होते. ते हयात असेपर्यंत परांजप्यांनी टिळकांच्याच भूमिकेचा प्रचार व प्रसार केला. परंतु टिळकांच्या मृत्यूनंतर महात्मा गांधीजींनी सुरू केलेल्या असहकारितेच्या चळवळीच्या मार्गाने आपणास निश्चितच ' स्वराज्य' प्राप्ती होईल, असे त्यांना ठामपणे वाटत होते. म्हणूनच त्यांनी गांधीजींनी सुरू केलेल्या 'असहकाराच्या चळवळी'त मनापासून भाग घेतला. गांधीवादाचा स्वीकार करताच त्यांनी 'स्वराज्य' पत्राच्या पहिल्याच अंकापासून गांधीजींच्या असहकारितेच्या तत्त्वास पूरक विचारांची मांडणी करण्यास सुरुवात केली. परांजपे असहकारितेच्या चळवळीत केवळ सहभागी झाले असे नाही, तर आपल्या सहभागास त्यांनी प्रत्यक्ष कृतीची जोड दिली.

२) परांजपे हे बहिष्काराच्या चळवळीचे कट्टर पुरस्कर्ते होते. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी बहिष्काराच्या तत्वाचा अवलंब केल्यास स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्ग सुकर होईल असे त्यांचे ठाम मत होते. म्हणूनच त्यांनी वेळोवेळी बहिष्काराच्या तत्त्वाचा आपल्या भाषणांमधून प्रभावी प्रचार व प्रसार करून समस्त हिंदुस्थान वासियांना त्याचे महत्त्व पटवून दिले. त्याहीपुढे जाऊन हिंदुस्तानच्या संपूर्ण स्वातंत्र्यप्राप्तीसाठी बहिष्कार व असहकारिता या दोन्ही तत्त्वांची व्याप्ती वाढवणे परांजपे यांना महत्त्वाचे वाटत होते.

३) परांजपे यांनी 'स्वराज्य' वृत्तपत्रात लिहिलेल्या 'एक कल्पक इंजिनियर" या अग्रलेखावरून कौन्सिल बहिष्काराबाबत त्यांची नेमकी कोणती भूमिका होती? हे आपल्या लक्षात येते. त्यात ते म्हणतात- "नॉन को- ऑपरेशन करावयाचे आणि कौन्सिलवर बहिष्कार घालावयाचा यात काही मोक्ष आहे म्हणून त्या गोष्टी करावयाच्या, असे नसून त्यापासून काहीतरी इष्ट हेतू म्हणजेच अर्थात स्वराज्यप्राप्ती-साध्य करून घेण्यासाठी त्या गोष्टी करावयाच्या आहेत. गिरण्यातील कामगार ज्याप्रमाणे आपल्या संपाने काही वेळपर्यंत बंद पाडून आपल्या जरुरीच्या मागण्या प्राप्त करून घेतात, त्याप्रमाणे अधिकाऱ्यांचे हे कौन्सिलचे कारखाने काही वेळपर्यंत चालू न देता, त्यांच्याकडून आपल्या स्वराज्याचे हक्क संपादन करून घेणे, हाच आपला या कौन्सिल बहिष्काराच्या संपामध्ये मुख्य हेतू आहे; आणि तो कसा साध्य होईल हा मुख्य विचाराचा प्रश्न आहे."

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी कौन्सिलमध्ये प्रवेश करून सरकारला केवळ शाब्दिक विरोध करत बसण्यापेक्षा बाहेर राहून जनतेची व्यापक संघटना उभारणे, तिला तीव्र चळवळीचे स्वरूप प्राप्त करून देणे व सरकारशी असहकार करणे हेच कार्य हिंदुस्तानच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या दृष्टीने परांजपे यांना अधिक योग्य व महत्त्वाचे वाटत होते आणि म्हणूनच त्यांनी स्वतः कधीच कौन्सिलमध्ये प्रवेश केला नाही.

**सारांश :**

'काळ'कर्ते शिवरामपंत परांजपे हे एक महाराष्ट्रातील जहाल देशभक्त व वैशिष्ट्यपूर्ण निबंधकार म्हणून ओळखले जातात. विद्यार्थीदशेत रत्नागिरीच्या सुप्रसिद्ध सरकारी हायस्कूलमधील शिक्षक विष्णूशास्त्री चिपळूणकर यांचा त्यांच्यावर विशेष प्रभाव पडला. स्वाभिमान, स्वधर्माभिमान, स्वदेशाभिमान व बाणेदारवृत्तीच्या त्यांच्या शिकवणूकीने शिवरामपंतांच्या मनात प्रचंड क्रांती घडून आली. त्यांच्यामुळेच शिवरामपंतांच्या अंतःकरणात देशप्रेमाची पहिली उर्मी उत्पन्न झाली. १८८२ मध्ये शिवरामपंतांनी पुण्याच्या 'न्यू इंग्लिश स्कूल'मध्ये प्रवेश घेतला. तेथेच त्यांची व टिळकांची

सर्वप्रथम भेट झाली. तेथील शिक्षक टिळक व आगरकर यांच्या निःस्वार्थी देशसेवेचा परांजप्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला.

१८९१ व १८९२ ही डेक्कन कॉलेजमधील फेलोशिपची दोन वर्षे परांजप्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरली. पुढे आयुष्यभर ज्या जहाल क्रांतीच्या तत्वज्ञानाचा त्यांनी हिरीरिने पुरस्कार केला, त्याची वैचारिक बैठक याच काळात तयार झाली. परांजप्यांवर रुसो, व्हॉल्टेअर, टॉलस्टॉय यांच्या समाजवादी विचारांचा मोठा प्रभाव पडला. त्यातूनच पुढे त्यांनी जहाल क्रांतीचे रोखठोक व खणखणीत तत्वज्ञान ‘काळ’ पत्रातून मांडले. परांजप्यांनी गुलामगिरीतून स्वातंत्र्य मिळविलेल्या राष्ट्रांच्या अभ्यासांती गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी सर्वच राष्ट्रांनी सशस्त्र उठाव केल्याच्या निष्कर्षाप्रत ते आले. त्यातूनच पुढे स्वातंत्र्य कसे मिळवावे? याबाबत त्यांनी ‘काळ’ पत्रातून आपले विचार मांडले. शिवरामपंत परांजपे यांच्या ‘काळ’ पत्रात त्यांच्या लेखणीचे सर्व गुण प्रकट झाले आहेत.

परांजप्यांचे राजकीय विचार व स्वातंत्र्यप्राप्तीचे मार्ग पाहता ते इतरांपेक्षा वेगळी होते. तद्वतच त्यांची स्वतःची अशी एक वेगळी लेखन शैली होती. 'काळ' वर्तमानपत्रातून लिहीत असताना त्यांनी ज्या वक्रोक्तीचा आधार घेतला त्यास प्रखर देशाभिमानाचे अस्तर लावल्याचे दिसून येते. परांजप्यांच्या 'काळा'तील लिखाणाने हजारो तरुणांच्या अंत:करणात तीव्र देशाभिमनाची बीजे रोवली गेली व महाराष्ट्रातील जनतेत एक नवचैतन्य निर्माण झाले. परांजपे यांनी आपल्या लिखाणातून लोकांच्या भावना चेतवून त्यांच्यात पारतंत्र्याविषयी कमालीची चीड निर्माण करून त्यांना स्वातंत्र्योन्मुख बनवण्याचे महान कार्य केले. परांजप्यांनी आयुष्याच्या सुरुवातीस टिळकांचे व नंतर गांधीजींचे राजकारण महाराष्ट्रभर प्रसारित करून जनतेच्या मनात तीव्र स्वातंत्र्य भावना जागृत केली. हिंदुस्तानच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी ज्या क्रांतीची त्यांना गरज वाटत होती ती त्यांनी अगोदर येथील जनतेच्या मनात निर्माण केली हे त्यांचे फार मोठे योगदान मानावे लागेल. थोडक्यात, लोकमान्य टिळकांच्या गतीशील राजकारणाला पोषक वातावरण तयार करण्याचे अतिशय महत्त्वपूर्ण काम परांजप्यांच्या स्वातंत्र्यवादामुळे यशस्वी झाले. त्यादृष्टीने परांजप्यांचे 'काळ' वृत्तपत्रातील विचार अतिशय महत्त्वाचे ठरल्याचे दिसून येतात.

**संदर्भ:**

१.परांजपे वा. कृ., (१९४५), ‘काळ’कर्ते शिवरामपंत परांजपे, प्रो. र. श्री. देशपांडे, सारस्वत कॉलनी, आवृत्ती पहिली, पुणे.

२. परांजपे वा. कृ., (१९५४), ‘शिवरामपंत परांजपे व्यक्ति, वक्तृत्व, वाङ्मय’, चित्रशाळा प्रकाशन, आवृत्ती पहिली, पुणे.

३. परांजपे शि. म., (२००८), 'काळातील निवडक निबंध'- खंड: १ ते ४, वरदा प्रकाशन, पुणे

४. परांजपे शि. म., (१९२८) , ' महाराष्ट्र प्रांतिक परिषद अधिवेशन' ६ वे, दिवेकर दिनकर वासुदेव, चिटणीस, सहावी महाराष्ट्र प्रांतिक परिषद, पुणे.

५. देशपांडे अ. ना., (१९७४), ‘आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास’- भाग १, व्हिनस प्रकाशन, पुनःमुद्रण, पुणे.

६. पांढरे नीला, (१९९३), ‘शि. म. परांजपे वाङ्मयीन अभ्यास’, पुष्प प्रकाशन लिमिटेड, प्रथमावृत्ती, पुणे.

७. देशपांडे अ. ना., (१९५४), ‘आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास’- भाग १, व्हिनस प्रकाशन, आवृत्ती पहिली, पुनःमुद्रण १९७४, पुणे,

८. कुलकर्णी अनंत अंबादास (संपादक), (१९५२), ‘स्वातंत्र्य-सुक्ते’ (काळातील निवडक निबंधांचा संग्रह-शि. म. परांजपे) प्रस्तावना, कॉन्टिनेंटल प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे.

९. मोरे सदानंद, (२००७), ‘लोकमान्य ते महात्मा’ खंड १, राजहंस प्रकाशन, आवृत्ती दुसरी, पुणे.